दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ५४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.१८ मे २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## पेणमध्ये मुसळधार पावसासह जोरदार वारा

**दै.रायगड नगरी । पेण**

ताउक्ते चक्रीवादळाचा तडाखा पेण तालुक्यालाही बसला असून तालुक्यातील वडखळ, गडब, खारपाले, आमटेम, कळवा, हमरापुर, जोहे, डोलवी, आदि गावांना या वादळाचा तडाखा बसला असुन मुसळधार पावसासह जोरदार वारा सुटल्याने बऱ्याच ठिकाणी विजेचे पोल व जागोजागी झाडे पडल्याने विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. तसेच काहींच्या घरांचे पत्रे उडाले तर काहींच्या घरांवर व गाड्यांवर झाडे पडल्याने आर्थिक नुकसान झाले आहे. तर गुराचा साठवुन ठेवलेला सुका चारा भिजला आहे.

या वादळी वाऱ्यासह पावसामुळे काहींचे अन्नधान्य भिजून खराब झाल्याने चिंतेचे वातावरण पसरले आहे.

विज पुरवठा खंडीत झाल्याने संपुर्ण तालुका अंधारात गेला आहे तर वादळाच्या भितीने नागरिकांनी रात्र जागुन काढली, तर कोरोना, निसर्ग चक्रीवादळ आणि आता ताउक्ते चक्रीवादळ या सर्व संकटांमुळे जनता हैराण झाली आहे.

# पनवेलमध्ये वेगवान वाऱ्यासह पावसाची संततधार

## पनवेलमध्ये प्रशासनाने राबविलेल्या उपाययोजनांमुळे चक्रीवादळावर यशस्वी मात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तौक्ते चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर संभाव्य आपत्ती उद्भवु नये यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणांनी विशेष खबरदारी घेतली होती. चक्रीवादळाच्या धसक्याने महापालिका, पोलीस प्रशासन, महसूल, अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन, पनवेल तहसील कार्यालय आदी यंत्रणांनी खबरदारी आणि उपाययोजनांच्या दृष्टिकोनातून चांगलीच कंबर कसली होती. पनवेल महानगरपालिकेने 'तौक्ते' चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर राबविलेल्या उपाययोजनेमुळे या संकटावर यशस्वीपणे मात करण्यात आली. नागरिकांचे स्थलांतरण, वीजपुरवठा आणि दळणवळण सुरळीत ठेवण्यात पालिकेसह पनवेल तहसील कार्यालयाला यश आले आहे.



चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास कार्यान्वीत ठेवला आहे. पनवेल, कामोठे, नवीन पनवेल, कळंबोली, तळोजा अशा सर्व नोडमध्ये प्रभाग अधिकारी, कर्मचारी आणि आपत्ती व्यवस्थापन कक्ष अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय साधून चक्रीवादळाच्या संकटावर मात करण्यात आली.



शनिवार (दि.१५ मे) पासूनच प्रशासनाने चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर पूर्व तयारी सुरू केली होती. महापालिका आयुक्त सुधाकर देशमुख यांनी परिमंडळ-२ चे उपायुक्त शिवराज पाटील, व उपविभागीय अधिकारी यांच्या समवेत फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून चक्रीवादळाच्या दरम्यान घ्यावयाच्या काळजी संदर्भात मार्गदर्शन केले होते. त्यासोबतच सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपत्ती काळात २४ तास दक्ष राहण्याच्या सुचना केल्या होत्या. विशेषत: कच्च्या घरात राहणाऱ्या नागरिकांचे स्थलांतर करण्यावर भर दिला होता. याकाळात वीज पुरवठा सुरळीत रहावा तसेच वादळामुळे रस्त्यांवर पडलेल्या झाडांमुळे वाहतुकीची कोंडी होऊ नये यासाठी त्या त्या विभागाने काटेकोर उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यामुळे रविवारी (दि.१६ मे)आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रभागनिहाय बैठका घेण्यात आल्या होत्या. तसेच आपत्ती काळात वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी गट तयार करण्यात आले होते. या गटांनी रात्रपाळी करून ज्या ज्या ठिकाणी मदत लागेल तिथे जाऊन नागरिकांच्या अडचणी सोडवल्या.

वादळ काळात कच्च्या घरात राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हालविण्यात आले. यामध्ये कातकरीवाडी येथील ८५ लोकांचे स्थलांतरण कर्नाळा क्रिडा संकुल येथे करण्यात आले. खारघर येथील जवळपास ८० नागरिकांचे कोपरा शाळेमध्ये स्थलांतरण करण्यात आले. कामोठे येथे बहुमजली इमारतीवरील शेड रस्त्यावर उडून पडल्याने रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. आपत्ती व्यवस्थापनाच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ हे शेड उचलून रस्ता वाहतुकीसाठी खुला करून दिला.

वेगवान वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याच्या घटना घडल्या. मात्र आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी जसजशी माहीती मिळेल तसतसे त्या त्या ठिकाणी जाऊन तात्काळ झाडे रस्त्यावरून बाजूला करून रस्ता वाहतुकीसाठी खुला करून दिला. यामध्ये धारणा कॅम्प, आगरी पाडा ,तोडरे गाव,कामोठे सेक्टर ३४, बालाजी अंगण सेक्टर ४ बेलपाडा, खारघर येथील सेक्टर २० मध्ये झाड पडल्याची घटना घडली, येथील वादळामुळे पडलेली झाडे आपत्ती व्यवस्थापन कर्मचाऱ्यांनी तातडीने रस्त्यावरून बाजूला केली. ठाणा नाका येथील रोडवरील झाड फायर बिग्रेडमशीनच्या साहाय्याने बाजूला करण्यात आले. कळंबोली कोविड समर्पित रुग्णालयाबाहेरील प्रवेशव्दाराजवळील पडलेले झाड बाजूला करून रूग्णालयाचा मार्ग मोकळा करण्यात आला. पनवेल कार्यक्षेत्राच्या सर्व नोडमध्ये वादळामुळे अनेक ठिकाणी झाडे पडल्याच्या घटना घडल्या असल्यातरी अद्यापपर्यंत (दि.१७ मे)कोणतीही मोठी हानी झालेली नाही. अजूनही महापालिकेचे आपत्ती व्यवस्थापनाचे काम चालूच आहे. तसेच वादळाचे संकट पुर्णपणे संपत नाही तोपर्यत आपत्ती व्यवस्थापनाचे काम चालूच राहणार असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

> पाणीपुरवठा, आरोग्य, विद्युत यांचा उत्तम समन्वय असल्यामुळे आपत्ती व्यवस्थापन व्यवस्थित पार पाडण्यात येत आहे.
> **- धैर्यशील जाधव (सहाय्यक आयुक्त, पनवेल महानगरपालिका)**

### विजेचे काही प्रमाणात नुकसान; मात्र महावितरणने वीजपुरवठा केला सुरळीत

निसर्ग चक्रीवादळाच्या तुलनेत तौक्ते चक्रीवादळाची तीव्रता अधिक न जाणवल्यामुळे पनवेलमध्ये विजेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले नाही. परंतु काही प्रमाणात झालेल्या वेगवान वाऱ्यामुळे शहरातील ठाणा नाका परिसरातील विजेच्या खांबावर झाड पडल्यामुळे काही वेळाकरीता विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला होता. त्याचप्रमाणे ओएनजीसी येथून भिंगारी सबस्टेशन येथे येणाऱ्या इनकमर वाहिनीवर देखील झाड पडल्यामुळे वीजपुरवठा खंडित करण्यात आला होता. तसेच शहरातील मिडलक्लास सोसायटी परिसरातील विद्युत वाहिनीवर झाड पडल्यामुळे दुरुस्तीसाठी तेथील वीजपुरवढा खंडित केला होता. आकुर्ली येथे एक बॅनर विद्युत वाहिनीवर उडून आल्यामुळे तारा तुटुन वीजपुरवढा खंडित झाला होता त्यामुळे तात्काळ बॅनर काढून तारांची जोडणी करून वीजपुरवढा सुरळीत करण्यात आला असल्याची माहिती पनवेल महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता जयदीप नानोटे यांनी दिली.

### पनवेल तहसीलदारांची घटनास्थळी त्वरित पाहणी



पनवेल आयटीआय जवळ महाकाय जाहिरात फलक झोपडपट्टी परिसरामध्ये कोसळल्याने तेथील काही घरांचे नुकसान झाले आहे. त्या ठिकाणी त्वरित पनवेल तहसीलदार विजय तळेकर व त्यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देवून मदतकार्य सुरू केले. तेथील आपदग्रस्तांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवनामध्ये तात्पुरते स्थलांतरीत केले आहे. तसेच घरपट्टी असणाऱ्या झोपडपट्टी धारकांना त्वरित नुकसान भरपाई शासनातर्फे दिली जाईल, असे तहसील कार्यालयातर्फे सांगण्यात आले आहे.

## संक्षिप्त...

### राज्यात तौत्के चक्री वादळाने घेतले ६ बळी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

तौत्के चक्रीवादळामुळे मुंबई तसेच सागरी किनाऱ्यांवरील जिल्ह्यांत निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतला तसेच चक्रीवादळाचा प्रवास गुजरातकडे होत असला तरी कोकणातील मुसळधार पाऊस व जोरदार वारे पाहता सावधगिरी बाळगण्याच्या आणि यंत्रणा सज्जच ठेवण्याचे निर्देश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.


तौत्के वादळामुळे एकूण ६ मृत्यू झाले असून ९ जण जखमी झाले आहेत. एकूण १२ हजार ५०० जणांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली आहे. किनाऱ्यावरील जिल्ह्यांमध्ये काही नुकसान व पडझड झाली असली तरी कोविड रुग्णालयांना वीजपुरवठा खंडित होऊ देण्यात आलेला नाही त्याचप्रमाणे पुरवठ्याची पर्यायी व्यवस्था सक्षमपणे सुरू आहे याविषयीही मुख्यमंत्र्यांनी माहिती घेतली. रस्त्यावरील पडलेली झाडे, पडलेले विजेचे खांब तातडीने काढून तसेच अगदी गावांपर्यंत जाणारे अंतर्गत रस्तेही मोकळे करून वाहतूक सुरू राहील याची काळजी घेण्यास मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनास सांगितले. मच्छिमारांच्या काही बोटींचे नुकसान झाल्याबाबतही त्यांनी माहिती घेतली. तोक्ते चक्रीवादळ किनाऱ्यालागत येऊ लागले तसतसे विशेषत: रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड भागात जोरदार पाऊस, वादळी वारे वाहू लागले तसेच मुंबईत देखील त्याचा परिणाम जाणवू लागला होता.

## उरणला चक्रीवादळाचा तडाखा ; राम मंदिराची भिंत कोसळून दोन महिलांचा दुर्दैवी मृत्यू

**दै.रायगड नगरी । उरण**

तौत्के चक्रीवादळाचा जोर काल १७ मे रोजी सकाळपासून रायगडच्या किनारपट्टीवर भागावर दिसून आला असून, या तौत्के चक्री वादळामध्ये उरण शहरातील मध्यवर्ती ठिकाणी राम मंदिराचे काम सुरू आहे.तेथील राम मंदिराची भिंत कोसळून दोन महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली आहे.

या तौत्के चक्रीवादळाचा फटका राज्याच्या पश्चिम किनारपट्टीला बसला असून, या वादळामुळे राज्यातील पहिलेव्ही २ बळी रायगड जिल्यातील उरण तालुक्यामध्ये गेले आहेत. येथील शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या राममंदिराची भिंत कोसळून हा अपघात झाला आहे.



सोमवारी पहाटेपासून ताउत्की चक्रीवादळाची तीव्रता वाढून उरण तालुक्यावरील वादळाची तीव्रता दिसु लागली आहे.

सोसाट्याच्या वाऱ्यामुळे बांधकाम सुरू असलेल्या या मंदिराची भिंत कोसळून आवेडा - केगाव येथील निता रमेश नाईक ६० वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आहे. तर दुसरी महिला उरण - नागाव येथील सुनंदाबाई भिमनाथ घरत ही गंभीर रित्या जखमी झाली असून, पुढील उपचारासाठी नवीमुंबई येथे हलविण्यात आले आहे. तेथील रुग्णालयात उपचार घेत असतांना या दुसऱ्या महिलेची प्राणज्योत मालवली.

अरबी समुद्रालागत असलेल्या उरणच्या समुद्र किनाऱ्याला या तौत्की चक्रीवादळाचा मोठ्याव प्रमाणावर फटका बसला असून, अनेक घरांची छपरे उडाल्याच्या घटना घडल्या आहेत. तर तालुक्यात ठीक ठिकाणी अनेक झाडे कोसळली असून, मार्ग बंद झाले होते. तर तालुक्यात सकाळ पासून या तौत्के चक्रीवादळाचा जोर वाढला होता. मात्र तो काही प्रमाणात कमी असल्याने पुढील दुर्घटना टळल्याने भयभीत झालेल्या नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

## 'तौक्ते' चक्रीवादळाचा म्हसळा तालुक्याला जोरदार फटका



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

रायगडमधील म्हसळा तालुक्याला तौक्ते चक्री वादळाचा जोरदार फटका बसला असून तालुक्यात अनेक गावात अनेक घरांची पडझड झाली असून अनेक घरांच्या पत्र्यांसह घरांची छप्परे उडाली असून या मध्ये लाखोंचे नुकसान झाले आहेत.

आंबा बागायत दारांचेही खूप प्रमाणात नुकसान झाले असून बागायत दार हवालदिल झाले आहेत. तयार आंब्यांसाह आंब्यांसाह सर्व आंबे उनमळून पडल्याची दृश्य तालुक्यात ठिकठिकाणी दिसत आहेत. शहरातील बाजारपेठेतही खूप प्रमाणात नुकसान झाल्याचे प्रत्यक्ष दर्शनी दिसत आहे. रात्री खूप मोठ्या प्रमाणात वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडल्याने ठिकठिकाणी छोटी मोठी झाडे उन्माळून पडली आहेत. कोकण किनारपट्टीला समांतर वाटचाल करत असलेल्या तौत्के चक्रीवादळानं गती घेतली आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस होत आहे. या पावसामुळे अनेक ठिकाणी झाड कोसळल्याची घटना समोर आल्या आहेत. तालुक्यातील कोळे, बनोटी, खरसई, मेंदडी, पाष्टी, आगारवाडा, पाभरे, खाडी किनारपट्टी भागात घरांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली असून आंबा बागायती सह घरांच्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करून योग्य ती नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी नागरिकांमधून जोर धरत आहे.

## तौक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीची माहिती जिल्हा प्रशासनाकडून जाहीर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तोक्ते चक्रीवादळाचा प्रभाव रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यावर मध्यरात्रीनंतर जाणवू लागला. सर्वत्र सोसाट्याचा वारा व मुसळधार पाऊस असे चित्र दिसत आहे. या दरम्यान जिल्ह्यातील आज सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत झालेल्या नुकसानीची माहिती जिल्हा प्रशासनाने जाहीर केली आहे. आतापर्यंत एकूण २३.४२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून जिल्ह्यातील ५ हजार २४४ घरांचे अंशत: नुकसान तर ९ घरांचे पूर्ण नुकसान झाले आहे. एकूण ४ व्यक्तींचा मृत्यू झाला असून, ६ व्यक्ती जखमी झाल्या आहेत. त्याचबरोबर २ प्राण्यांचाही मृत्यू झाला आहे. जिल्ह्यातील एकूण २ हजार २९९ कुटुंबांचे मिळून एकूण ८ हजार ३८३ व्यक्तींचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्यात आले आहे. महावितरणच्या एकूण १३५ HT पोलचे, ४१८ HT पोलचे तर ८ ट्रान्सफॉर्मरचे नुकसान झाले आहे. जिल्ह्यात एकूण ९९ कोविड रुग्णालये कार्यरत आहेत. त्यापैकी रायगड ग्रामीण क्षेत्रातील एकूण ५४ कोविड रुग्णालयापैकी २२ रुग्णालये थेट वीजपुरवठयाद्वारे सुरु असून ३२ कोविड रुग्णालये जनरेटर बॅकअपवर सुरळीत सुरू आहेत. त्याचप्रमाणे पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ४५ कोविड रुग्णालयापैकी ४४ रुग्णालये थेट विद्युत पुरवठयावर सुरू असून १ रुग्णालय जनरेटर बॅकअप वर सुरळीत सुरू असल्याची माहितीही जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

अलिबाग मध्ये ९७ घरांचे अंशत: नुकसान झाले असून, १ प्राण्याचा मृत्यू झाला आहे. महावितरणच्या एचटी पोल-९, एलटी पोल-७० चे नुकसान झाले आहे, ३ कोविड रुग्णालय जनरेटर बॅकअपवर सुरळीत सुरू आहेत. १५६ कुटुंबातील ६०५ जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. पेण मधील १०७ घराचे अंशता: नुकसान झाले असून, तिचा मृत्यू झाला असून एक व्यक्ती जखमी झाला आहे. तसेच एका प्राण्याचाही मृत्यू झाला आहे. महावितरणच्या एचटी पोल-८, एलटी पोल-२० चे



नुकसान झाले आहे. ५ कोविड रुग्णालय जनरेटर बॅकअपवर सुरळीत सुरू आहेत. ६२ कुटुंबातील १९३ जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. मुरुड तालुक्यातील २८ घरांचे अंशत: नुकसान झाले असून, दोन कोविड हॉस्पिटल पैकी एक वीजपुरवतयावर तर दुसरा जनरेटर बॅकअपवर सुरळीत सुरू आहे. ३१६ कुटुंबातील १ हजार ६७ जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. पनवेल तालुक्यातील ४३ घरांचे अंशत: नुकसान झाले असून, महावितरणच्या एलटी पोल-२ चे नुकसान झाले आहे. १२ कोविड हॉस्पिटल पैकी १२ हॉस्पिटल वीज पुरवठाद्वारे सुरळीत सुरू आहेत. १६८ जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. उरण तालुक्यातील १६ घराचे अंशतः नुकसान झाले असून, १ घराचे पूर्णतः नुकसान झाले आहे. २ व्यक्ती मृत्यू झाल्या आहेत. महावितरणच्या एचटी पोल-२१ तर एलटी पोल-२३ चे नुकसान झाले आहे. ३ कोविड हॉस्पिटल वीजपुरवठयाद्वारे सुरळीत सुरू आहेत. १२२ कुटुंबातील ४५१ जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे.

कर्जत तालुक्यातील १८५ घरांचे अंशत: नुकसान झाले असून, एका घराचे पूर्णतः नुकसान झाले आहे. महावितरणच्या एचटी पोल-६ तर एलटी पोल-१७ चे नुकसान झाले आहे. १५ कोविड हॉस्पिटल पैकी ८ हॉस्पिटल वीजपुरवठाद्वारे तर ७१ हॉस्पिटल जनरेटर बॅकअपद्वारे सुरळीत सुरू आहेत.

..../२

# गोव्याची दुर्दशा

ऑक्सिजनचा पुरेसा पुरवठा होत नसल्याने गोव्यातील रुग्णालयात पाच दिवसांत ८३ जणांना प्राण गमवावे लागणे अत्यंत दुर्दैवी असून, साथरोग व्यवस्थापनात देशाप्रमाणेच हे चिमुकले राज्यही सपशेल अपयशी ठरत असल्याचे दर्शविणारे आहे. गोवा वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात ऑक्सिजनचा अपुरा पुरवठा होत असल्याने गेल्या मंगळवारपासून शनिवारपर्यंत दररोज रुग्ण दगावत असताना, तेथील सरकारने मात्र असे काही घडत नसल्याचे सांगणे धक्कादायक आहे. ऑक्सिजनचा पुरवठा पुरेसा नसल्याचे रुग्णालयाने न्यायालयात प्रतिज्ञापत्राद्वारे सांगितल्यानंतरही तांत्रिक शब्दप्रयोग वापरीत दुर्घटना नाकारण्याचा सरकारचा प्रयत्न जबाबदारी झटकण्याचा आहे. याच बेजबाबदार वृत्तीमुळे गोव्यात गेल्या पंधरवड्यात रुग्णसंख्येत मोठी वाढ झाली आहे. साधारणतः दोन महिन्यांपूर्वी गोव्यात करोना साथरोगाची स्थिती अतिशय आटोक्यात होती. सक्रिय रुग्णसंख्या पाचशेच्या घरात होती, दररोज बाधित होणाऱ्यांची संख्या ५० ते ७५ च्या घरात होती. एकूण चाचण्यांपैकी बाधितांचे प्रमाण जेमतेम पाच टक्के होते. सध्या हे प्रमाण ५० टक्क्यांच्या घरात पोहोचले असून, दैनंदिन रुग्णसंख्या तीन हजारांवर गेली आहे. एकूण सक्रिय रुग्ण तीस हजारांच्या घरात आहे. शेजारच्या महाराष्ट्रासह देशात अनेक ठिकाणी करोनाची दुसरी लाट तीव्र होत असताना गोवा सरकारने कोणतीही काळजी घेतली नाही. पर्यटन सुरूच ठेवले. पर्यटकांसाठी चाचण्यांपासून मास्क वगैरे वापरण्यापर्यंत कोणतीही बंधने लावली नाहीत. लग्नसमारंभ, मेजवान्या अतिशय थाटात होत होत्या. या साऱ्यांवर बंधने घालावीत, असा इशारा जाणकार देत असतानाही गोवा सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. त्याचे दुष्परिणाम आता दिसू लागले आहेत. गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत हे स्वतः वैद्यक क्षेत्रातील आहेत. कोव्हिडची दुसरी लाट नियंत्रणात ठेवण्यासाठीच्या सूचना आणि इशाऱ्यांकडे झालेले दुर्लक्ष म्हणूनच आश्चर्यकारक आहे. मुख्यमंत्री डॉ. सावंत आणि आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांच्यातील समन्वयाचा अभाव आणि कोव्हिडबाबतच्या अनेक धोरणात्मक मुद्द्यांवरील विसंगती याचाही फटका बसत असल्याकडे जाणकार लक्ष वेधत आहेत. छोटी राज्ये प्रशासनासाठी सोयीचे असतात आणि तिथे संकटावर नियंत्रण मिळविणे अतिशय सोपे असते, असा युक्तिवाद करणाऱ्यांना गोव्याने सध्या खोटे पाडले आहे. पंधरा लाखांच्या आतबाहेर लोकसंख्या असलेल्या या राज्याला करोनाच्या दुसऱ्या लाटेचा जबरदस्त तडाखा बसत असून, प्रशासन हतबल झाल्याची स्थिती आहे. गोवा वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयातील ऑक्सिजन समस्या हे त्याचे उदाहरण. ७०८ खाटांची सोय असलेल्या या रुग्णालयात शनिवारी ९५३ रुग्ण होते आणि त्यांपैकी ३३० रुग्णांना ऑक्सिजनची गरज होती. त्याची पूर्तता होत नसल्याने रुग्ण दगावू लागल्यानंतर, ऑक्सिजनच्या अभावामुळे नव्हे, तर कोव्हिड न्यूमोनियामुळे मृत्यू होत असल्याचे कारण सुरुवातीला दिले जाऊ लागले. या रुग्णालयाला आवश्यक असलेल्या वैद्यकीय ऑक्सिजनची सोय करण्यात येत असल्याचे सांगून आरोग्यमंत्री राणे यांनी एक प्रकारे प्राणवायूच्या अभावाची कबुलीच दिली; परंतु सरकार तसे थेट म्हणायला तयार नाही. मे महिन्याच्या पहिल्या बारा दिवसांत गोव्यात ४१७ जणांचा कोव्हिडमुळे मृत्यू झाला आहे. एप्रिलपर्यंत सारे काही आलबेल आहे असल्याच्या आविर्भावात प्रशासन होते. त्याचीच ही परिणती आहे. अन्य राज्यांतील वाढती रुग्णसंख्या पाहून वेळीच निर्बंध घातले असते, तर ही स्थिती उद्भवली नसतील. जे देशात घडते आहे, तेच गोव्यात होते आहे. पर्यटकांचे आकर्षण असलेल्या या राज्यातील स्थिती जशी चिंताजनक आहे, तशीच स्थिती देशाच्या ग्रामीण भागातील आहे. एप्रिलमध्ये मुंबई, पुणे, दिल्ली, बेंगळुरू यांसारख्या महानगरांसह काही मध्यम आकारांच्या शहरांत रुग्णसंख्या वाढत होती. तिथे रुग्णालये, व्हेंटिलेटर आदी सुविधा मर्यादित प्रमाणात का होईना होत्या. तरीही ऑक्सिजनअभावी रुग्ण दगावण्याच्या दुर्घटना दिल्लीसह अनेक शहरांत झाल्या. करोना आता वेगाने ग्रामीण भागात पसरतो आहे. ग्रामीण भारतातील आरोग्याची दुरवस्था आजची नसली, तरी करोनाचा संसर्ग लक्षात घेऊन तिथे तयारी होणे आवश्यक होते. मात्र, तसे झालेले नाही. ग्रामीण भागात रुग्णालये, अतिदक्षता विभाग आणि ऑक्सिजन या साऱ्यांचीच कमतरता आहे. ऑक्सिजन तुटवड्याचा प्रश्न शहरांतही अद्याप संपलेला नाही. त्यामुळे ग्रामीण भागात तो कसा सोडविणार असा प्रश्न आहे. मात्र, सर्व शक्ती पणाला लावून प्रयत्न करावे लागतील. अन्य ग्रामीण भागातील रुग्णांना नजीकच्या शहरांकडे धाव घेण्याखेरीज पर्याय नाही. करोनाबद्दल भीती असल्याने लक्षणे असूनही लोक चाचणी करीत नसल्याच्या घटना ग्रामीण भागात घडत आहेत. अशा रुग्णांचा मृत्यू झाल्यास तेही दडवून ठेवण्याचा प्रकारही होतो आहे. उत्तर प्रदेश, बिहार येथे नद्यांत मृतदेह आढळण्याशी याचा थेट संबंध असू शकतो. या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात रुग्णालय आणि ऑक्सिजन सुविधा पोहोचविण्यावर भर देण्याची गरज असून, त्याची युद्ध पातळीवर पूर्तता व्हायला हवी. अन्यथा परिस्थिती आणखी बिघडण्याचा धोका आहे.

# वादळाने रोहा तालुक्यात अंशतः नुकसान



**दै.रायगड नगरी । रोहा**

अरबी समुद्रातून गुजरात कडे निघालेल्या तौक्ते चक्रीवादळामुळे रोहा तालुक्यातील घरांचे अंशतः नुकसान झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यात मागील २४ तासात २३.४२ मिली तर रोहा तालुक्यात सरासरी १९ मिली पावसाची नोंद झाली आहे. रोहा तालुक्यातील तांबडी फणसाडी वाडी येथील १० घरांचे तर जिल्ह्यातील ८३९ घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. मेढा येथील हरिश्चंद्र लाड यांच्या घराचे तर रोहा तालुक्यातील घोसाळे आरोग्य उपकेंद्राचे पत्रे उडाल्याने नुकसान झाले आहे. सोसाट्याचा वारा आणि पावसाची शक्यता लक्षात घेऊन खंदार, किल्ला, भुवनेश्वर, ताम्हणशेत, धामणसई, गारबट, निवी, बारसोली, कवळठे या आदिवासी वाड्यांवरील अंदाजे १०० कुटुंबातील५२३ व्यक्तींना जवळच्या सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. जिल्ह्यातील २२६३ कुटुंबातील ८३८३ व्यक्तींचे स्थलांतर करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तालुक्यात ताशी ८० –९० किमी वेगाने वारे वाहत असल्याने झाडे पडून रस्ते बंद होऊ नयेत यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पोलिस प्रशासनाने जेसीबी, वुड कटर, दोऱ्या, बॅटरी यांची जय्यत तयारी ठेवली होती.रोहा शहरात विजेचा लपंडाव सुरू होता. मात्र चणेरा, घोसाळे, धाटाव, धामणसई, पिंगळसई या भागात मात्र मागील २४ तास विज पुरवठा खंडित झाला असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे.

प्रशासनाने पूर्वानुभव लक्षात घेऊन योग्य ती खबरदारी घेतली असल्याने मोठे नुकसान झालेले नाही. सोसाट्याचा वारा आणि पाऊस यामुळे कापणीसाठी तयार झालेल्या उन्हाळी भातशेतीचे मात्र मोठे नुकसान झाले असून पिके आडवी झाली आहेत.रोहा तालुक्यात सोनगाव येथे विजेचा एक खांब कोसळला असून सोसाट्याच्या वाऱ्यामुळे झाडांच्या फांद्या पडल्याने वीज वाहून नेणाऱ्या तारा तुटण्याचे प्रमाण अधिक असले तरी लवकरच ग्रामीण भागातील विज पुरवठा सुरळीत करण्यास महावितरण यशस्वी होईल असा अंदाज उपअभियंता वाघमोडे यांनी व्यक्त केला आहे.रोहा उपविभागीय अधिकारी डॉ यशवंतराव माने व तहसीलदार कविता जाधव संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवत असून सर्व खाते प्रमुखांशी संपर्क साधून परिस्थितीवर नियंत्रण ठेवत आहेत.

# सर्व लोकप्रतिनिधी, प्रशासकीय यंत्रणांचा समन्वय व नागरिकांची साथ यामुळे चक्रीवादळापासून होणारी मोठी हानी रोखण्यास यश

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तौक्ते चक्रीवादळाचा प्रभाव रायगड जिल्ह्यातील किनारपट्टी भागात मध्यरात्रीनंतर जाणवू लागला. वादळीवाऱ्यासह पावसाच्या जोरदार सरींमुळे जनजीवन विस्कळीत झाले. जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी आणि जिल्हा परिषद प्रशासन, महसूल विभाग, पोलिस प्रशासनासह इतर सर्व शासकीय विभाग यांनी चक्रीवादळाचा सामना करण्यासाठी जनजागृती करण्यासोबतच योग्य समन्वयाने नियोजन केले होते. त्याला नागरिकांची सकारात्मक साथ मिळाली. यामुळे मोठ्या प्रमाणात हानी टाळता आली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

ताउत्के चक्रीवादळाचा प्रभाव रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यावर मध्यरात्रीनंतर जाणवू लागला. या चक्रीवादळाचा सामना करण्यासाठी शासकीय स्तरावर मोठी तयारी करण्यात आली होती. यासाठी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी , जिल्हा परिषद प्रशासन, महसूल विभाग, पोलिस प्रशासनासह इतर सर्व शासकीय विभाग यांनी एकत्रित काम केले. चक्रीवादळादरम्यान नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी, याबाबत व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात आली होती.

चक्रीवादळापासून नागरिकांचा बचाव करण्यासाठी समुद्रकिनारी तसेच चक्रीवादळाचा प्रभाव जाणवणाऱ्या क्षेत्रातील कच्च्या किंवा मोडकळीस आलेल्या घरांमधील २ हजार २६३ कुटुंबांमधील ८ हजार ३८३ नागरिकांचे सुरक्षित ठिकाणी स्थळांतर करण्यात आले होते. याकामी महसूल विभागासोबत ग्रामपंचायत प्रशासनाने कंबर कसली होती. स्थलांतर करण्यात आलेल्या नागरिकांची योग्य ती काळजी संबंधित ग्रामपंचायत प्रशासनाने घेतली होती. तसेच आरोग्य व्यवस्था सुरळीत राहील यासाठी जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या होत्या. वेळोवेळी सर्व विभागांचे जिल्हा स्तरावरील अधिकारी चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेत होते.

सोमवारी दुपारपर्यंत चक्रीवादळामुळे जिल्ह्यातील १ हजार ७८४ घरांचे अंशत: नुकसान तर ५ घरांचे पूर्ण नुकसान झाले आहे. एकूण ३ व्यक्तींचा मृत्यू झाला असून, दोन व्यक्ती जखमी झाल्या आहेत. त्याचबरोबर २ प्राण्यांचाही मृत्यू झाला आहे. ठिकठिकाणी विद्युत पोलचे नुकसान झाले आहे. झाडे पडल्याच्या घटना घडल्या आहेत, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

# चक्रीवादळाने नागोठणे व परिसराला झोडपले : वादळवाऱ्यासह पाऊस



**दै.रायगड नगरी । वाकण**

तौत्के चक्रीवादळाचा प्रभाव रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यावर मध्यरात्रीनंतर जाणवू लागल्यानंतर मध्यरात्रीच्याच सुमारास नागोठणे शहर व परिसरालाही या चक्रीवादळाने झोडपून काढले. मध्यरात्री पासूनच परिसरात व आदिवासी वाड्यांवर सर्वत्र सोसाट्याच्या वादळ वा–यासह व मुसळधार पाऊस असे चित्र होते. मात्र सोमवारी दिवसा पावसाचे प्रमाण किरकोळ असले तरी वादळवारा मात्र मोठ्या प्रमाणात होता. सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास वादळवा–याचा वेग काहीसा कमी झाल्याचे दिसून आले. या चक्रीवादळामुळे सुदैवाने कोणतीही जिवितहानी झालेली नाही.

या चक्रीवादळामुळे नागोठणे ग्रामीण भागात झाडे कोसळण्याच्या तुरळक घटना घडल्या आहेत. नागोठण्याजवळील कोंडगाव ग्रामपंचायत हद्दितील कातळावाडी येथे समाज मंदिरावरील सिमेंटचे पत्रे या चक्रीवादळामुळे उडून नुकसान झाले आहे. तसेच नागोठणे विभागातील उंचावरील ठिकाण असलेल्या चेराठी आदिवासी वाडी येथील मंदिरावर झाड कोसळ्याने तेथील मंदिर व समाज मंदिराच्या इमारतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

याशिवाय एकळघर येथील राजिप शाळेचे सिमेंटचे पत्रे उडून शाळेच्या इमारतीचेही नुकसान झाले आहे. तर नागोठणे व परिसरातील वीटभट्ट्यांचेही या अवकाळी पावसामुळे नुकसान झाले आहे. या चक्रीवादळामुळे विज वितरण कंपनीचेही विद्युत तारा व कंडक्टर तुटणे, काही ठिकाणी विजेचे खांब पडणे अशाप्रकारचे नुकसान झाले असुन त्यांची तपासणी करण्यात येत आहे. त्यानुसार बाळसई गावापर्यंतचा वीजपुरवठा सुरु करण्यात आला असून वादळवारा कमी होताच व आवश्यक ती दुरूस्ती करुन इतर भागातील वीजपुरवठाही लवकरात लवकर पूर्ववत करण्यात येईल असे वीजपुरवठा वितरणचे नागोठण्यातील कनिष्ठ अभियंता वैभव गायकवाड यांनी सांगितले.

दरम्यान नागोठणे विभागातील ग्रामीण भागांतही काही नागरिकांच्या छोट्या घरांवरचे कौले व पत्रे या चक्रीवादळामुळे उडाल्याने तेथील नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले आहे. याशिवाय येथील ज्या शेतकऱ्यांच्या आंबे, काजू पिकांचेही नुकसान झाले असेल त्यांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन त्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी नागरिक व शेतकऱ्यांतून होत आहे.

# दिव्यांग व्यक्तींच्या लसीकरणाला १८ मे पासून सुरवात ; प्रितम म्हात्रे यांच्या मागणीला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दिव्यांग व्यक्तींना आठवड्यातील एक दिवस आणि एक ठिकाण ठरवून ऑफलाईन नोंदणी करून लसीकरण करण्याची मागणी पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी निवेदनादवारे आयुक्तांकड़े केली होती. त्यांच्या या मागणीला यश आले आहे. पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व लसीकरण केंद्रावर दिनांक १८ मे २०२१ पासून संध्याकाळी ४ ते ५ या वेळेमध्ये ४५ वर्षावरील दिव्यांग बांधवांचे प्राधान्याने लसीकरण करण्यात येणार आहे.



पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ४५ वर्षावरील दिव्यांगांसाठी लसीकरण मोहीम १८ मे पासून सुरू करण्यात येत आहे. दिव्यांग व्यक्तींना ऑनलाईन नोंदणी करणे शक्य होत नसल्याने त्यांच्यासाठी आठवड्यातील एक दिवस आणि एका ठिकाणी ऑफलाईन पद्धतीने नोंदणी करून लसीकरण करावे. अशी महत्वाची मागणी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी केली केली. या मागणीला यश आले आहे. पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व लसीकरण केंद्रावर दिनांक १८ मे २०२१ पासून संध्याकाळी ४ ते ५ या वेळेमध्ये ४५ वर्षावरील दिव्यांग बांधवांचे प्राधान्याने लसीकरण करण्यात येणार आहे. महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिका अभिलेखात नोंदणी असलेल्या दिव्यांग व्यक्तींपैकी ४५ किंवा त्याहून अधिक वय असलेल्या महानगरपालिका अभिलेखात असलेला रहिवासाचा पत्ता विचारात घेऊन ३०४ दिव्यांगांना परिशिष्टात नमूद केलेले लसीकरणाचे केंद्र नेमून देण्यात येत आहे.

४५ वर्षावरील दिव्यांग व्यक्तींचे लसीकरण नेमून दिलेल्या ठिकाणी व दिनांकाला योग्यरित्या पार पडेल याची दक्षता घेणेची आहे. तसेच संबंधित लसीकरण केंद्र यांना त्याबाबतच्या सुचना देण्यात याव्यात व लसीकरणापासून कोणताही दिव्यांग व्यक्ती वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.असे आदेश आयुक्त यांनी वैद्यकीय आरोग्य अधिकारी, पमपा याना दिले आहेत. तसेच यादीतील ४५ वर्षावरील दिव्यांग व्यक्ती लसीकरणासाठी संबंधित दिनांकास व ठिकाणास उपस्थित राहतील याकरीता आपल्या अधिनस्त असणाऱ्या कर्मचाऱ्यांमार्फत यादीतील दिव्यांग लोकांना यादीत नमूद केलेल्या संपर्क क्रमांकावर संपर्क करण्याचा आहे. सदर दिव्यांग व्यक्ती लसीकरणासाठी संबंधित केंद्रावर वेळेत जातील याची दक्षता घ्यावी असे वॉर रूम प्रमुख, पमपा याना सांगण्यात आले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## तोक्ते चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीची माहिती जिल्हा प्रशासनाकडून जाहीर

४८ जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. खालापूर तालुक्यातील १६५ घरांचे अंशत: नुकसान झाले असून, महावितरणच्या एलटी पोल–२ चे नुकसान झाले आहे. ९ हॉस्पिटल पैकी २ हॉस्पिटल वीज पुरवठाद्वारे तर ७ हॉस्पिटल जनरेटर बॅकअपद्वारे सुरळीत सुरू आहेत. ६७० जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. माणगाव तालुक्यातील ४८ घरांचे अंशत: नुकसान झाले असून, महावितरणच्या एचटी पोल–१६ तर एलटी पोल–३२ चे नुकसान झाले आहे. ३ कोविड पैकी १ हॉस्पिटल वीज पुरवठाद्वारे तर २ हॉस्पिटल जनरेटर बॅकअपद्वारे सुरळीत सुरू आहेत. २९१ कुटुंबातील १ हजार ३०९ जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. रोहा तालुक्यातील ५५ घरांचे अंशत: नुकसान झाले असून, महावितरणच्या एलटी पोल–४ चे नुकसान झाले आहे. ३ कोविड हॉस्पिटल जनरेटर बॅकअपद्वारे सुरळीत सुरू आहेत. १०० कुटुंबातील ५२३ जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. सुधागड तालुक्यातील ५१ घरांचे अंशत: नुकसान झाले असून, एका घराचे पूर्णतः नुकसान झाले आहे. महावितरणच्या एचटी पोल–५ तर एलटी पोल–२५ चे नुकसान झाले आहे. एक कोविड हॉस्पिटल वीजपुरवठाद्वारे सुरळीत सुरू आहे. ४५ कुटुंबातील १८५ जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. तळा तालुक्यातील २५ घरांचे अंशत: नुकसान झाले असून, २ घराचे पूर्णता नुकसान झाले आहे. ३६ कुटुंबातील १३५ जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे.

महाड तालुक्यातील ९८ घरांचे अंशत: नुकसान झाले असून, महावितरणच्या एलटी पोल–२ चे नुकसान झाले आहे. ५ कोविड हॉस्पिटल पैकी २ हॉस्पिटल वीजपुरवठाद्वारे तर ३ हॉस्पिटल जनरेटर बॅकअपद्वारे सुरळीत सुरू आहेत. १९५ कुटुंबातील १ हजार ८० जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. पोलादपूर तालुक्यातील ११८ घरांचे अंशत: नुकसान झाले असून १ व्यक्ती जखमी झाला आहे. महावितरणच्या एलटी पोल–२५ चे नुकसान झाले आहे. ८१ कुटुंबातील २९५ जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. म्हसळा तालुक्यातील २७४ घरांचे अंशत: नुकसान झाले असून, १ कोविड हॉस्पिटल वीज पुरवठाद्वारे सुरळीत सुरू आहे. १३४ कुटुंबातील ४९६ जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. श्रीवर्धन तालुक्यातील ५७६ घरांचे अंशतः नुकसान झाले असून, महावितरणच्या एलटी पोल–२७, ट्रांसफार्मर–१ चे नुकसान झाले आहे. १ कोविड हॉस्पिटल जनरेटर बॅकअपद्वारे सुरळीत सुरू आहे . ७६१ कुटुंबातील १ हजार १५८ जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे.

# तौक्ते चक्रीवादळात सुधागड तालुक्यातील ५१ घरांचे नुकसान, ३० विजेचे खांब कोसळले, वीज पुरवठा खंडित

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

तौक्ते चक्रीवादळामुळे सुधागड तालुक्यात सोमवारी (ता.१७) पहाटे तीनच्या सुमारास सोसाट्याचा वारा व पावसाला सुरुवात झाली. या चक्रीवादळामुळे ५१ घरांचे अंशतः नुकसान झाले असून तब्बल ३० विजेचे खांब कोसळले आहेत.



तालुक्यातील माणगाव, हातोंड, भेलिव, दर्यागाव, गौळमाळ आदी विविध गावांमध्ये घरांचे पत्रे व कौले उडणे, छप्पर पडणे या स्वरूपात नुकसान झाले आहे. सुधागड तालुक्यात दुपारी २ वाजेपर्यंत २६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. वादळाच्या पार्श्वभूमीवर ४५ कुटुंबातील एकूण १८५ व्यक्तींना अन्य सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे. ५ हाय टेन्शन पोल व २५ लो टेन्शन पोल पडले असून विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. महावितरणतर्फे दुरुस्तीची कामे युद्ध पातळीवर सुरू आहेत.

रस्ते वाहतूक सुरळीत आहे. जमेची बाजू म्हणजे कोणतीही जीवितहानी झाली नाही. शेती नुकसानीबाबत संबंधित कृषी सहाय्यक तसेच घरांच्या नुकसानीबाबत संबंधित ग्रामसेवक व तलाठी यांना नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती सुधागड–पाली तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी दिले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## उभ्या ट्रेलरला मोटार सायकलीची धडक; एक जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नादुरूस्त उभ्या असलेल्या ट्रेलरला पाठीमागून मोटारसायकलीवरून येऊन धडकल्याने झालेल्या अपघातात मोटारसायकलस्वार जखमी झाल्याची घटना पनवेलजवळील कोळखे गावाच्या हद्दीत घडली आहे.

पनवेल जवळील कोळखे गाव मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर महिंद्रा शोरूमच्या समोर देवी लल्लू प्रसाद (वय-२९) या ट्रेलरचालकाने त्याचा नादुरूस्त त्याठिकाणी उभा करून ठेवला असताना तसेच कोणत्याही प्रकारची निशाणी किंवा लाईट चालू न ठेवल्याने सदर ट्रेलरचा अंदाज मोटारसायकलीवरून आलेला भावेश शेंदरे (वय-२२) न आल्याने त्याने ट्रेलरला पाठीमागून धडकल्याने झालेल्या अपघातात तो जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## कोरोनावर मात करून पोलीस निरीक्षक सुरेश गेंगजे आपल्या कर्तव्यावर रूजू

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा पोलिस ठाण्यातील पोलीस निरीक्षक सुरेश गेंगजे या कोरोना योध्दयाला कोरोना झाला होता. ईच्छाशक्ती व प्रतिकारशक्ती बळावर १५ मे रोजी कोरोना वर मात करून ठणठणीत बरे होऊन सुखरूप घरी आले.

१५ रोजी तळा पोलिस ठाणे येथे आपल्या सेवेतील कर्तव्यावर रूजू झाले आहेत. रायगड जिल्ह्यात तळा तालुका हा दुर्गम डोंगराळ तालुका म्हणुन ओळखलाजातो.सुरवातीस हा तालुका कोरानामुक्त होण्याच्या मार्गावर होता परंतु मधल्या काळात लॉकडाऊन शिथील झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात चाकरमानी दाखल झाल्यानंतर कोरोना पॉजेटीव्ह रुग्ण आढळुन आल्याने तालुक्यात भीतीचे वातावरण पसरले होते.मात्र तालुक्यातील प्रशासन आणि पोलीस यंत्रणा सज्ज असल्याने लॉकडाऊचे पालन नियमितपणे करण्यात आले. ज्या व्यक्तींना कोरोना विषाणुची बाधा झाली होती ते रुग्ण उपचारानंतर पुर्ण पणे बरे झाले आहेत. केवळ १५ रुग्णावर सध्या उपचारसुरुअसल्याने तळेवासियांना दिलासा मिळाला असुन शासनाचे नियम पाळत कोरोनावर मात करण्याचे आवाहन प्रशासन आणि पोलीस यंत्रणे मार्फत करण्यात येत आहे.या काळात कोरोना योध्दा म्हणून आपली सेवा देत असताना या कोरोना योध्याला कोरोना झाल्याचे लक्षणे जाणवू लागल्याने कोरोना विषाणू चाचणी करण्यात आली. कोरोना पॉझिटिव्ह रिपोर्ट १ मे रोजी निष्पन्न झाले होते त्यानंतर त्वरीत या कोरोना योध्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार करून बरे होऊन ते ७ मे रोजी घरी आले. प्रकृती ठीक झाल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार हा कोरोना योध्दा १५ मे रोजी तळा पोलिस ठाणे येथे आपल्या कर्तव्यावर रूजू झाले आहेत. यावेळी तळा पोलीस ठाण्याच्या सहा.पो.नि.सोनाली जावडे, प्रियंका वंजारी व पोलिस कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहात पुष्प देऊन व पुष्पवर्षाव करून स्वागत केले.

# बारामती ॲग्रो संस्थेचा प्रशासनाला मदतीचा हात ; कोकण विभागासाठी २४ ऑक्सिजन कॉन्सेंन्ट्रेटर

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

बारामती ॲग्रो या संस्थेने कोकण विभागासाठी २४ ऑक्सिजन कॉन्संन्ट्रेटर देऊन जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी प्रशासनाला मदतीचा हात दिला. बारामती ग्रो संस्थेने हे २४ ऑक्सिजन कॉन्सेंन्ट्रेटर आज कोकण विभागाचे महसूल आयुक्त श्री. अण्णासाहेब मिसाळ यांच्या हाती सुपूर्द केले.



राज्यासह देशभरामध्ये सध्या ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे मोठ्या प्रमाणात रुग्ण दगावण्याच्या घटना समोर येत आहेत. अशा परिस्थितीत रुग्णांवर वेळेत उपचार व्हावेत आणि त्यांना ऑक्सिजन वेळेत मिळावा, यासाठी सध्या ऑक्सिजन कॉन्सेंन्ट्रेटर संजीवनी ठरत आहे. परंतु या उपकरणांची उपलब्धता ही मर्यादित असल्यामुळे, तसेच ही उपकरणे महागडी असल्यामुळे अनेकांना ऑक्सिजन कॉन्सेंन्ट्रेटर खरेदी करणे शक्य होत नाही. राज्यात ऑक्सिजन, औषधे, उपकरणांचा तुटवडा होऊ नये यासाठी शासन सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे. वाढत्या रुग्ण संख्येमुळे शासनावर अतिरिक्त ताण पडत आहे. अशा परिस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार यांची बारामती ॲग्रो ही संस्था मदतीचा हात घेऊन पुढे आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमध्ये एकूण ५०० ऑक्सिजन कॉन्सेंन्ट्रेटर वाटप करण्याचे लक्ष या संस्थेने ठेवले असून, आजपासून या शूभकार्याचा प्रारंभ करण्यात आला आहे. कोकण विभागासाठी १ लिटर चे ७ आणि १० लिटरचे (प्रती मिनीट क्षमतेचे) १७ असे एकूण २४ ऑक्सिजन कॉन्सेंन्ट्रेटर देण्यात आले आहेत.

कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्हयांतील ग्रामीण भागात ऑक्सिजन तुटवडा होऊ नये. यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून, तसेच या ठिकाणी असलेल्या कोरोना काळजी केंद्रांमध्ये अचानकपणे गंभीर होणाऱ्या किंवा प्राणवायूची आवश्यकता भासणाऱ्या रुग्णांना तातडीने उपचार पुरवण्याच्या दृष्टीने या ऑक्सिजन कॉन्सेंन्ट्रेटरचा संजिवनी म्हणून उपयोग करण्यात येणार आहे. बारामती ग्रो संस्थेने प्रशासनाला केलेल्या या सहकार्याबद्दल कोकण विभागीय आयुक्त अण्णासाहेब मिसाळ यांनी संस्थेचे प्रमुख आमदार रोहित पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष अशोक गावडे, प्रदेशाध्यक्ष नामदेव भगत, नवी मुंबई युवक अध्यक्ष राजेश भोर, युवक कार्याध्यक्ष सौरभ काळे, बेलापूर विधानसभा कार्याध्यक्ष आकाश पाटील, बारामती ग्रो लि. चे प्रतिनिधी अजय दोंदे यांचे आभार मानले.

या प्रसंगी उप आयुक्त (सामान्य) मनोज रानडे, उप आयुक्त (पुरवठा) विवेक गायकवाड आदि अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शासनाने वेळोवेळी दिलेल्या कोरोना प्रतिबंधक मार्गदर्शक तत्त्वानुसार सुरक्षित अंतर ठेवून सर्व नियमांचे पालन करुन हा कार्यक्रम पार पडला.

कोरोना संकटामध्ये अशा पद्धतीने माणुसकीच्या भावनेतून पुढे येणाऱ्या अशा सर्व सामाजिक संस्थांचे कोकण विभागीय आयुक्त अण्णासाहेब मिसाळ यांनी मन:पूर्वक आभार मानले असून इतरांनीही जमेल त्या मार्गाने प्रशासनाला मदत करण्यासाठी पुढे यावे,असे आवाहनही केले.

# कळंबोलीत सिडकोच्या व्यवस्थापनाचा झाला चिखल ; काढलेला गाळ दोन महिने रस्त्यावरच पावसात झाला चिखल

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

कळंबोली वसाहतीमधील नालेसफाई तुन काढलेला गाळ गेल्या दोन महिन्यापासून रस्त्याच्या बाजूला पडून आहे. गाळ सुकल्यानंतर उचलला जाईल असं संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितलं होतं. मात्र गाळ दोन महिने झाला तरी उचलला गेला नाही आणि आजच्या झालेल्या मुसळधार पावसात रस्त्यावरील गाळाचा पुन्हा चिखल होऊन बहुतांशी गाळा पुन्हा नाल्यात गेल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे येथील नागरिकांनी संताप व्यक्त करून सिडकोच्या व्यवस्थापनाचा एकप्रकारे चिखल झाल्याचे बोलले जात आहे. लाखो रुपये खर्च करूनही सिडकोच्या गलथान कारभाराचा फटका नागरिकांना अनेक वर्ष बसत आहे.



दरवर्षी पावसाळ्यात अगोदर लाखो रुपये खर्च करून नालेसफाई केली जाते ही नालेसफाई कशा प्रकारे केली जाते हे सर्वांनाच माहीत आहे. नालेसफाई नसून एक प्रकारे सिडकोच्या तिजोरी ची सफाई आहे असं उघड उघड बोलले जात आहे. मात्र याकडे सिडकोच्या अधिकाऱ्यांना ना खंत ना खेद आहे .यावर्षी दोन महिन्यापूर्वी काढलेला गाळ रस्त्याच्या बाजुला तसाच पडून आहे. याबद्दल सिडकोचे कळंबोलीतील अधिकारी दिग्विजय खिल्लारे यांच्याशी बोलले असता सदर चा गाळ ओला आहे व तो सुकल्यानंतर उचलला जाईल.

मात्र गेल्या दोन महिन्यापासून सुकलेला गाळ हा जंतू मिश्रित असलेला आहे. सुकल्यामुळे तो मोठ्या वाऱ्यावर उडून नागरिकांच्या नाकातोंडात व घर-ातही जात आहे. त्यामुळे त्यातूनही रोग जंतू पसरण्याचे भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. मात्र याचे सोयरसुतक येथील संबंधित अधिकाऱ्यांना अजिबात नसल्याचे उघड होत आहे.

लाखो रुपये जनतेच्या पैशातून खर्च केले जात असताना काढलेला गाळ उचलला की नाही उघडलेली गटारी बंद केली की नाही हे सुद्धा पाहिले जात नाही किंवा त्याचे परीक्षण केले जात नाही असा आरोप आता नागरिकांमधून होत आहे. आज झालेल्या पावसात चिखलमय गाळ रस्त्याच्या बाजूला असलेल्या उघड्या जागेतून पुन्हा गटारत गेला आहे. काही ठिकाणी उघडलेली गटारे तसेच सताड उघडे असून त्याच्यावर झाकण लावण्याची तसाडी सिडकोने घेतली नाही. त्यामुळे जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे लाखो रुपये खर्च करून गाळ काढण्याचा फायदा काय असा आता सवाल नागरिक विचारीत आहेत. याबाबत संबंधित अधिकाऱ्याला फोन केला असता त्यांनी फोन उचलला नाही. गाळ उपसण्याचे काम करणाऱ्या ठेकेदारांची बिले सिडकोने पूर्ण खात्री केल्याशिवाय दिली जाऊ नयेत अशी मागणी आता नागरिकांमधून होत आहे.

# नोकरीला लावतो असे सांगून दोघांची केली दहा लाखांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नोकरीला लावतो असे सांगून दोघांची दहा लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपींविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

टाटा मेमोरियल सेंटर, खारघरमध्ये उपमुख्य सुरक्षा अधिकारी म्हणून काम करत असलेले राजन मोतीराम चव्हाण हे त्यांना प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करण्याचे काम करतात. २०१६ मध्ये टाटा मेमोरियल सेंटर कडून ए ग्रेड नर्स या पदाची जाहिरात काढण्यात आली होती. यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. यातून २७ उमेदवारांची निवड करण्यात आली. त्यावेळी २३ उमेदवार ग्रेड ए नर्स या पदावर हजर झाले. भरती प्रक्रिया पार पडल्यानंतर जानेवारी २०२० मध्ये ए ग्रेड नर्स या पदाच्या भरती प्रक्रियेमध्ये भ्रष्टाचार झाल्याबद्दल भरत धोंडे यांनी टाटा मेमोरियल सेंटर यांच्या मेलवर तक्रार केली होती. त्यानुसार चव्हाण यांनी धोंडे यांच्याकडे चौकशी केली असता येथील कर्मचारी आणि युनियनचा पदाधिकारी किरण पाटील याने उमेदवारांकडून पैसे घेऊन भरती केली असल्याची माहिती देण्यात आली.

२३ उमेदवारांपैकी आरती वैभवकुमार पोवार आणि आरती सतीश कुंडेला (आरतीजुट्टू) यांच्याकडून किरण प्रकाश पाटील यांनी नोकरी लावून देतो असे सांगून प्रत्येकी पाच लाख म्हणजे दहा लाख रुपये घेतले. मात्र किरण पाटील याने कोणत्याही परीक्षेचा पेपर किंवा कौशल्य चाचणीचा तपशील दिला नव्हता. तसेच त्या दोघांना पैसे परत न करता नोकरीला देखील लावले नाही. त्यामुळे टाटा मेमोरियल सेंटर येथील लॅब टेक्निशियन किरण प्रकाश पाटील (राहणार खारघर) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# तळा विनाकारण फिरणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

**दै.रायगड नगरी । तळा**

राज्यात कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे प्रशासनाने लॉकडाऊन व संचारबंदी जाहीर केली आहे. तसेच साथरोग प्रतिबंध कायदा ही लागू करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर तळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गेंगजे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय शिवराज खराडे व पी. एस.आय सोनाली जवादे यांच्या अध्यक्षतेखाली तळा पोलिसांनी कडक नाकाबंदी सुरू केली आहे.

तळा तालुक्यात कोरोना रुग्णांची संख्या कमी प्रमाणात असली तरी तालुक्यात गर्दीद्वारे संसर्ग होऊ नये याची खबरदारी पोलीस प्रशासनाकडून घेण्यात येत आहे. बाजारपेठेत जीवनावश्यक वस्तूंची खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी वाढत असल्याने ती रोखण्यासाठी पोलिसांकडून कडक नाकाबंदीकरण्यात येत आहे. शहरात विनाकारण फिरणाऱ्या मोटारसायकल व चार चाकी गाड्या गर्दी साठी कारणीभूत ठरत असल्याने आशा विनाकारण फिरणाऱ्या मोटारसायकल स्वार व चारचाकी गाड्यांवर पोलिसांकडून दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.



# पनवेल महानगर पालिका क्षेत्रात रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९५ टक्क्यांवर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने संपुर्ण देशभर थैमान घातला आहे.महाराष्ट्र राज्यात बाधितांच्या आकड्यामध्ये अव्वल स्थानी आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात देखील कोविडचा थैमान पहावयास मिळाला. संपुर्ण पालिका क्षेत्रात देखील कोविड बाधितांचा आकडा ५५ हजारांच्या पुढे गेला आहे. मात्र कोविडच्या दुसऱ्या साथीवर काहीप्रमाणात नियंत्रण येताना दिसत असुन रुग्ण बरे होण्याची संख्या झपाटयाने वाढत चालली आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात रुग्ण बरे होण्याची टक्केवारी ९५ च्या आसपास पोहचली असुन हि सकारत्मक बाब समोर आली आहे.

आजपर्यंतच्या सुमारे ५५०६३ बाधितांपैकी तब्बल ५१८९७ रुग्ण पूर्णपणे बरे झाले आहेत. त्यामुळे कोरोनाची भीती न बाळगता बाधितांनी वेळेवर उपचार घेतल्यास नक्कीच कोविड मधुन सुखरूप सुटका होत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. कोविडच्या दुस-या लाटेत पनवेल महानगरपालिका क्षेत्रात रुग्णांची संख्या झपाट्याने वाढली होती. विशेष म्हणजे एकाच दिवसाचा बाधितांचा आकडा तब्बल ७०० पर्यंत देखील गेला होता. या नंतर लॉकडाऊनमुळे परिस्थिती पुन्हा नियंत्रणात आली असुन नागरिक देखील कोविड पासुन बचावासाठी योग्य ती काळजी घेत असल्याचे दिसुन येत आहे. कोविडवर कोणतेही प्रभावी औषध असे उपलब्ध नाही. त्यामुळे प्रशासनासमोर सध्या जास्तीत जास्त लसीकरण पर्याय सध्याच्या घडीला उपलब्ध आहे. त्यामुळे प्रशासनाने देखील लसीकरणावर भर दिला आहे. पालिका क्षेत्रात सद्यस्थितीत एक लाख नागरिकांचे लसीकरण पूर्ण झाले आहे.अद्यापही मोठ्या संख्येने नागरिकांना लसीकरणाची प्रतीक्षा आहे. त्यामुळे लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबविण्याकरिता पालिका प्रशासनाला विविध उपाययोजना राबवाव्या लागणार आहेत.दि. १५ रोजी पालिका क्षेत्रात विविध आस्थापना व कार्यालये , गृहसंकुले आदी ठिकाणी लसीकरण करण्याकरिता नवीन धोरण आखले आहे. त्यामुळे या लसीकरणाला गती प्राप्त होणार आहे. पालिका क्षेत्रातील १०३९ रुग्णांना कोविडमुळे आपला जीव गमवावा लागला आहे. मात्र यामध्ये बहुतांशी सह्व्याधी असलेल्या रुग्णांची संख्या मोठी होती. त्यामुळे लसीकरण व वेळेवर उपचार घेतल्यास कोविड पासुन मुक्तता होणार आहे. नागरिकांनी हि बाब गांभीर्याने लक्षात घेऊन कोविड बाबत सतर्कता बाळगणे गरजेचे आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात खारघर शहरात कोरोनाचे सर्वाधिक रुग्ण नोंदविले गेले आहेत. तर कमी लोकसंख्येमुळे तळोजा मध्ये सर्वात कमी रुग्णाची नोंद केली गेली आहे. सध्याच्या घडीला पालिका क्षेत्रात २१२७ विद्यमान रुग्ण आहेत. कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पालिका क्षेत्रात आयुक्त सुधाकर देशमुख यांच्या मार्गदर्शनाने ब्रेक द चेन हि मोहीम राबविली जात आहे.

> कोविडची लक्षणे दिसल्यास त्वरित चाचणी करा. काही त्रास नसेल तर घरीच विलगीकरणात राहुन पालिकेच्या आरोग्य विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या सूचनांचे पालन करा. त्रास जाणवल्यास रुग्णालयात दाखल व्हा. कोरोना बरा होतो त्यामुळे भीती न बाळगता वेळेवर उपचार घेतल्यास कोविड मधुन मुक्तता होते.
>
> **-डॉ आनंद गोसावी (मुख्य वैद्यकीय अधिकारी, पनवेल महानगरपालिका)**

# चक्रीवादळात उरण पंचायत समितीचे कार्यतत्पर कार्यालय बंद; त्वरित दखल घेऊन सुरू

**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्ह्यात चक्रीवादळाची शक्यता असल्याने सर्व प्रशासन यंत्रणेला सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी दिले असतानाही उरणमधील कार्यतत्पर समजले जाणारे पंचायत समिती कार्यालयात कोणीही हजर नसून ते बंद असल्याने नागरिकांत नार-ाजीचा सूर असून याची चौकशी करून दोषीं अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे विचारणा केल्यावर व फोटो व्हायरल होताच उरण पंचायत समितीची यंत्रणा खडबडून जागी झाली.

रायगड जिल्हयाच्या किनारपट्टीवर दि. १६ व १७ मे २०२१ या कालावधीमध्ये चक्रीवादळ येत असल्याबाबत भारतीय हवामान खात्याने इशारा दिला आहे. या कालावधीत वाऱ्याचा वेग खूप जास्त असण्याचा तसेच मुसळधार पावसाचीही शक्यता आहे. तरी ग्रामस्थांनी खालीलप्रमाणे काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या अध्यक्ष निधी चौधरी तसेच निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन



प्राधिकरणच्या सदस्य सचिव डॉ.पद्मश्री बैनाडे यांनी केले आहे. त्याचबरोबर कोणत्याही आपत्तीस तोंड देण्यासाठी जिल्हा प्रशासन सर्वतोपरी सज्ज असून नागरिकांनी काळजी करू नये, प्रशासन देत असलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असेही आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

उरणमधील तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्ग सज्ज आहेत. मात्र तालुक्यातील ग्रामपंचायतीचे हेडकॉर्टर समजले जाणारे कार्यतत्पर उरण पंचायत समितीचे कार्यालय बंद असून गेटही बंद आहेत. याबाबत गटविकास अधिकारी नीलम गाडे यांच्याशी मोबाईलवरून संपर्क साधला असता त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच अंजने यांच्याशी संपर्क साधला असता आम्ही ग्रामसेवकांना सतर्क रहाण्याचे आदेश दिल्याचे सांगितले. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी याची दखल घेऊन संबंधित सर्व अधिकारी वर्गाना त्वरित हजर रहाण्याचे आदेश दिले.

# गुन्हे शाखा कक्ष-०२ पनवेलने केला देशी दारूचा साठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सध्या कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव होवू नये म्हणुन राज्यभरामध्ये लॉकडाउन चालु असताना देखील काही इसम हे देशी दारु संत्रा जीएम दारूच्या अवैधरित्या विक्री करीत असल्याने त्यांचेवर कारवाई करणेबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आदेशीत केले होते. त्या अनुशंगाने गुन्हे शाखा कक्ष-०२ पनवेलचे वपोनि गिरीधर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने पनवेल जवळील भिंगारी गाव येथे छापा टाकून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीररित्या केलेला देशी दारूचा साठा हस्तगत केला आहे.

गुन्हे शाखा कक्ष-०२ पनवेलचे हेड कॉन्स्टेबल सुनिल कुदळे यांना माहिती मिळाली की, एक इसम हा भिंगारी गाव, पनवेल परिसरामध्ये एका सफेद रंगाच्या गोणीमध्ये देशी दारू संत्रा दारू आणुन विक्री करीत आहे. त्यानुसार पोलिस हवालदार मधुकर गडगे, निवृत्ती वाघ, पोलिस नाईक दिपक डोंगरे, पोलिस शिपाई प्रविण भोपी आदींच्या पथकाने सदर ठिकाणी जाऊन १८० चङ च्या एकूण ९० देशी दारू संत्रा च्या बाटल्या सफेद गोणीमध्ये मिळुन



आल्याने तेथील एका व्यक्तीस मुद्देमालासह ताब्यात घेऊन त्याचेविरुद्ध पनवेल शहर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ ई प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# संक्षिप्त...

## सावत्र वडिलांनीच केला आपल्या विवाहित मुलीचा विनयभंग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सावत्र वडिलांनीच आपल्या कुटूंबियांसह झोपलेल्या विवाहित मुलीचा विनयभंग केल्याची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात सदर महिलेने दिली आहे.

शहरातील तक्का दर्ग्याजवळील कातकर वाडी झोपडपट्टी येथे राहणारी एक विवाहित महिला हि आ-पले सावत्र वडिल, तिचे पती, मुले, आई व भावंडांसह आईच्या घरात झोपले असताना तिच्या सावत्र वडिलांनी वाईट हेतूने तिच्या अंगाशी चाळे करून तिचा विनयभंग केल्याने या महिलेने सदर तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात दिली आहे.

## विना परवाना ताडी विक्रीवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विना परवाना ताडी विक्री करणाऱ्यांवर कळंबोली पोलिसांनी कारवाई केली आहे.

कळंबोली वसाहतीत विना परवाना झोपडपट्टी परिसरात ताडी विक्री केली जात असल्याची माहिती वपोनि संजय पाटील यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने येथील सिडको ऑफिस शेजारील नाल्याजवळील झोपडपट्टीलगत फूटपाथवर ताडी विक्री करणाऱ्या महिलेविरूद्ध कारवाई करून तिच्याकडील ताडी सदृष्ठ द्रव पदार्थ जप्त केला आहे.

## सुधागड तालुक्यात सोमवारी २ कोरोना बाधित रुग्णाची नोंद; ६ जण झाले बरे

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यात सोमवारी (ता.१७) २ कोरोना बाधित रुग्णांची नोंद झाली आहे. तर ६ जण बरे झाले आहेत. सध्या तालुक्यात कोरोनाचे १३६ सक्रिय रुग्ण आहेत अशी माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली.

तालुक्यात आत्तापर्यंत कोरोनाचे १०२९ रुग्ण झाले असून ८५१ रुग्ण बरे झाले आहेत. आणि तब्बल ४२ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अशी माहिती देखील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी दिली आहे. नागरिकांनी शासन नियमांचे पालन करून योग्य खबरदारी व काळजी घ्यावी आणि घाबरून जाऊ नये असे आवाहन डॉ. शशिकांत मढवी यांनी केले आहे.



# श्रीवर्धनमध्ये चक्रीवादळाचा धोका टळला ; कोणतीही जीवितहानी नाही

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्याला तौक्ते या चक्रीवादळाचा तडाखा बसला नसला तरी सोसाट्याच्या वाऱ्याने मात्र काही ठिकाणी नुकसान झाल्याच्या घटना घडल्या. शेवटचे वृत्त हाती येईपर्यंत कोणतीही जीवित हानी झाली नसल्याचे तहसीलदार सचिन गोसावी यांनी सांगितले. हवामान खात्याने दिनांक १६ व १७ या दिवशी चक्रीवादळाचा धोका असल्याचे सांगितले होते.



दिवेआगर येथे रस्त्यावर झाड पडल्याचे समजताच दिघी सागरी पोलिस ठाण्याचे कर्तव्यदक्ष अधिकारी सहा पोलिस निरीक्षक संदीप पोमन व कर्मचारी यांनी वुडकटरच्या साह्याने मार्ग तात्काळ मोकळा केला. रविवारी सायंकाळी पासुनच वीज गायब झाली होती व सोमवारी सायंकाळी पर्यंत वीजपुरवठा सुरू झाला नव्हता. रविवारी दिनांक १६ संध्याकाळी पासूनच जोरदार वाऱ्याला सुरुवात झाली रात्री वादळी वाऱ्यासह मध्यम व मुसळधार पासून सोमवारी दुपारपर्यंत सुरू होता. हवामान खात्याच्या अंदाजानुसार वादळाची तीव्रता कमी असल्याने श्रीवर्धन तालुक्यातील धोका टळला असल्याने सर्वांनी सुटकेचा निःश्वास टाकला. तौक्ते चक्रीवादळाचा पार्श्वभूमीवर दिघी सागरी पोलिस ठाण्याचे सहा पोलिस निरीक्षक संदिप पोमन, तहसीलदार सचिन गोसावी तसेच प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी योग्य ती खबरदारी घेतली होती.

मागील वर्षीच्या 'निसर्ग' चक्रीवादळाचा अनुभव होता त्यामुळे तौक्ते या चक्रीवादळाची तीव्रता तितकीच असेल अशी मनात भिती होती. त्यामुळे रविवारी संध्याकाळ पासुनच वादळी वारा सुटल्याने अनेकांच्या पोटात गोळा येऊ लागला होता. शिवाय जसजसे चक्रीवादळ मुंबई च्या दिशेने सरकत होते तसतसे जिल्ह्यात वादळी वारा वाढत होता मात्र गेल्या वर्षी सारखे चक्रीवादळ नाही आले याबद्दल सर्वांनी मनोमन देवाचे आभार मानल्याने देखील पाहायला मिळाले. रविवारी संध्याकाळी वीजपुरवठा खंडित झालेला तो सोमवारी संध्याकाळ पर्यंत पूर्ववत झाला नव्हता. व्होडाफोन तसेच जिओ मोबाईल नेटवर्क असल्याने अनेकांना चक्रीवादळाचा बातम्या मिळत होत्या. यादरम्यान किनारपट्टीवरील ७६१ कुटुंबियांना स्थलांतरीत करण्यात आले.

तौक्ते चक्रीवादळामुळे कुठेही नुकसान होऊ नाते व सर्वांच्या सुरक्षेसाठी वडवळी व बोर्लीपंचतन मध्ये रविवारी रात्री ११ पासून सोमवारी सकाळी पर्यंत मुस्लीम प्रार्थनास्थळ मध्ये प्रार्थना करत असल्याचे ऐकायला मिळाला. त्यामुळे या भागात चक्रीवादळाचे संकट दूर होण्यासाठी सर्वधर्मीय प्रार्थना पाहायला मिळाली.

दिघी सागरी पोलिस ठाण्याचे सहा पोलिस निरीक्षक पोमन हे रविवारी संध्याकाळ पासुनच आपल्या कर्मचार्यांसह गावोगावी पाहणी करत होतो. सर्वांनी काळजी घ्या, गरज लागल्यास पोलिसांना कळवा असे कळकळीचे आवाहन ते करत होते. शिवाय कुठेही अडचण असल्यास पोलीस ठाण्यामार्फत समस्या सोडवण्यासाठी विशेष टीम बनवली होती.

# माणगांव तालुक्यात तोक्ते चक्रीवादळाने ४६ घरांचे नुकसान मात्र जीवित हानी नाही

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

दि. १६ मे च्या दुपार नंतर माणगांव तालुक्यात तोक्ते चक्री वादळाचे वारे वाहू लागले व पाऊस सुरू झाला. सोमवार दि. १७ मे २०२१ रोजी हिंद महासागरातुन अरबी समुद्राकडे आलेले तोक्ते तेच क्रीवादळामुळे रायगड जिल्ह्यात वादळ सदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता वर्तविण्यात आली होती. तसेच या कालावधित कोणीही घरा बाहेर पडु नये, तसेच घरात पिण्याचे पाणी व खाण्याच्या पदार्थांचा पुरेसा साठा करुन ठेवणे, नागरिकांनी स्वतःची वाहने सुरक्षित ठिकाणी पार्क करुन ठेवणे. कारण मोठी झाडे पडुन गाडीचे नुकसान होणार नाही, मुसळधार पाऊस पडते वेळी घरातील काचेच्या खिडक्यांपासुन दूर राहावे, धोकादायक व कच्च्या घरामध्ये राहणाऱ्यांनी या कालावधित सुरक्षित ठिकाणी स्वतःची राहणेची व्यवस्था करणे असे जाहीर आवाहन माणगांव नगरपंचायत प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

तोक्ते चक्रीवादळामुळे माणगांव तालुक्यातील ४६ घरांचे अंशत: नुकसान झाले असल्याची दुपार पर्यंत माहिती नोंद झाली आहे. आणखी माहिती तलाठ्यां मार्फत मिळणे बाकी आहे. तालुक्यात पावसाचे प्रमाण १७ मि. मी. इतके झाले. प्रशासनाने २९१ कुटुंबातील १ हजार ३०९ जणांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केले आहे अशी माहिती माणगांव तहसीलदार प्रियांका आयरे यांनी दिली आहे.

काल रात्री २ वा. पासूनच तालुक्यात वीज पुरवठा खंडित झाला होता. काही गावांमध्ये अल्पशा प्रमाणात विजेच्या तारांवर झाडाच्या फांद्या पडून तुटल्याची माहीती महावितरण कंपनीकडून मिळाली. काही भागात दुपार पासूनच विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात आला असून आज संध्याकाळ पर्यंत संपूर्ण तालुक्यात विद्युत पुरवठा सुरळीत होईल असे महावितरण कंपनीकडून सांगण्यात आले.

कोरोना महामारी सुरु व चक्रीवादळचे संकट कोकण व परिणामी रायगड वासीयांवर आले. मात्र माणगांव तालुक्यातील तालुका प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने जिल्हा प्रशासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करत कोरोनामध्ये ऑक्सिजन चा तुटवडा आपत्तीजनक परिस्थिती मध्ये होऊ नये या करिता विळे भागाड एमआयडिसी मध्ये असणाऱ्या आयनोक्स एअर या कंपनीच्या वाहतुकीत कुठे अडथळा निर्माण होऊ नये याकरिता पोलीस दल व आपत्ती व्यवस्थापन साधने पोलिस प्रशासनाकडून तैनात ठेवण्यात आली होती. तसेच ग्रामपंचायत क्षेत्रातील पोलीस पाटील व स्थानिक नागरिक यांनी सतर्क राहावे असे आदेश माणगाव उपविभागीय पोलिस अधिकारी प्रवीण पाटील यांनी पोलीस प्रशासनाला दिले होते. सतर्कतेमुळे व प्रशासनाच्या कामगिरीमुळे काही प्रमाणात वित्तहानी झाली असली तरी कुठल्याही प्रकारची जीवित हानी मात्र झालेली नाही. असे माणगांव उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील व माणगांव उपविभागीय अधिकारी प्रशाली दिघावकर-जाधव यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले आहे.

# पनवेलमध्ये खाजगी लसीकरणाचा मार्ग मोकळा

## गृहसंकुल, कार्यालयांसाठी पालिकेचे धोरण जाहीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सरकारी लसीकरणाच्या गोंधळामुळे संभ्रमावस्थेत असलेल्या पनवेल करांसाठी पालिकेने नवीन लसीकरण धोरण आखले आहे. खाजगी लसीकरणाचा मार्ग पनवेल महानगरपालिकेने मोकळा केला असून मान्यताप्राप्त रुग्णायलांच्या माध्यमातुन शहरातील गृहसंकुले व विविध कार्यालयात लसीकरणाला पालिकेने परवाणगी दिली आहे. मुंबई, ठाण्याच्या धर्तीवर पनवेल मध्ये देखील खाजगी रुग्णलयामार्फत लसीकरण केले जाणार असुन पालिकेच्या माध्यमातुन देखील लसीकरण सुरु राहणार आहे.तिसऱ्या लाटेपुर्वी जास्तीत जास्त नागरिकांचे लसीकरण करण्यासाठी आयुक्त देशमुख यांनी हे धोरण आखले आहे.

लसीकरणाला सुरुवात झाल्यापासुन आजतागायत लसीकरणातील गुंता सुटलेला नाही.पालिकेच्या लसीकरण केंद्रावर मोठ्या प्रमाणात सोशल डिस्टसिंगचे उल्लंघन होत असते. गर्दीत उभे राहून देखील अपुऱ्या साठ्या अभावी अनेकांना रिकाम्या हाती परतावे लागते.तिसऱ्या लाटेपुर्वी जास्तीत जास्त नागरिकांचे लसीकरण करण्यासाठी शासकीय पातळीवर विविध प्रयत्न सुरु आहेत.पालिकेच्या या धोरणाअंतर्गत विविध खाजगी कार्यालये,गृहसंकुले व विविध आस्थापनाना रुग्णालयांशी संलग्नता प्रस्तापित करावी लागणार आहे.पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातुन कोविन प्लॅटफॉर्मवर त्याची नोंदणी केली जाईल. हि कार्यालये व गृहसंकुलांना महानगरपालिकेतर्फे स्वतंत्रपणे साईट मॅनेजर म्हणुन समाविष्ट करून घेण्यात येईल. या केंद्रावर लसीकरणासाठी परवाणगी देताना त्याठिकाणी प्रतीक्षा कक्ष,लसीकरण कक्ष,निरीक्षण कक्ष आदींची सुविधा उपलब्ध आहे कि नाही याची खात्री करण्यात येणार आहे.तसेच त्याठिकाणी डॉक्टर्स , स्टाफ नर्स, डेटा एंट्री ऑपरेटर,इतर आरोग्य कर्मचारी इंटरनेट ,रुग्णवाहिका, आवश्यक औषधे आदी सुविधा उपलब्ध आहे कि नाही याची खातरजमा पालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांमार्फत केली जाणार आहे. पालिका क्षेत्रात लसीकरणाचा एका लाखांचा टप्पा पार झाला आहे. संपूर्ण पालिका क्षेत्राची लोकसंख्या १० लाखांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे जास्तीत जास्त लसीकरण होणे गरजेचे आहे. तिसऱ्या लाटेपूर्वी जास्तीत जास्त लसीकरण करणे याकरिता शासकीय पातळीवर प्रयत्न सुरु आहेत. या धोरणामुळे नागरिकांचे जास्तीत जास्त लसीकरण पूर्ण होईल व तिसऱ्या लाटेपुर्वी मोठ्या संख्येने नागरिकांचे लसीकरण पूर्ण झालेले असेल अशी प्रतिक्रीया पालिका आयुक्त सुधाकर देशमुख यांनी दिली

सध्याच्या घडीला सुरु असलेल्या लसीकरणाच्या गोंधळात ऑनलाईन नोंदणीची गरज आहे. मात्र खाजगी लसीकरणासाठी कोणताही प्रकारच्या ऑनलाईन नोंदणीची आवश्यकता भासणार नाही.या धोरणाअंतर्गत कोवीन ऍपवर ऑक इन , तसेच व दि स्पॉट नोंदणीकरण करून लसीकरणाची मुभा देण्यात आलेली आहे.

# तळा तालुक्यात मुसळधार पावसासह सोसाट्याचा वारा ; २३ घरांचे नुकसान

**दै.रायगड नगरी । तळा**

रायगड जिल्ह्याला मुसळधार पावसासह चक्रीवादळाचा तडाखा बसणार असल्याचा ईशारा हवामान खात्याकडून देण्यात आला होता. हवामान खात्याने वर्तविल्याप्रमाणे चक्रीवादळाचा प्रभाव मध्यरात्रीपासून जाणवू लागला. तळा तालुक्यात रविवारी मध्य रात्रीपासून मुसळधार पावसाळा सुरुवात झाली. मुसळधार पावसासह सोसाट्याचा वारा देखील सुटला होता.तळा तालुक्यात एकूण सरासरी २१ मी.मी.पावसाची नोंद झाली आहे. यामुळे तालुक्यातील २३ घरांचे अंशतः नुकसान झाले असून १ घराचे पूर्णतः नुकसान झाले आहे.

तसेच काही ठिकाणी झाडे कोसळण्याच्या घटना देखील घडल्या आहेत. या तुरळक घटना सोडल्या तर सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. तालुक्यातील समुद्र किनारी राहणाऱ्या ३६ कुटुंबातील १३५ नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. गेल्या वर्षी आलेल्या निसर्ग चक्रीवादळात नागरिकांची घरे जमिनदोस्त झाली होती, बागबागायतींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते तसेच अन्न धान्य देखील मोठ्या प्रमाणावर भिजले होते. या वर्षी आलेल्या चक्रीवादळामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले नसले तरी उन्हाळी भात पीक घेणाऱ्या बळीराजाचे मात्र त्याच्या मोत्याप्रमाणे हातातोंडाशी आलेल्या पिकाचे नुकसान झाले आहे. चक्रीवादळामुळे महावितरण विभागाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नसले तरी सुरक्षेच्या कारणास्तव तालुक्यातील वीज पुरवठा बंद ठेवण्यात आला आहे. नगरपंचायत, पोलीस व तहसील प्रशासनाकडून तालुक्यातील घडामोडींवर लक्ष ठेवले जात आहे. तसेच कोणीही विनाकारण घराबाहेर पडू नये असे आवाहन देखील करण्यात येत आहे.

# कळंबोलीत वादळाचा तडाखा विजेचे खांब व झाड जमीनदोस्त

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

भूमध्य सागरातील बदलामुळे निर्माण झालेल्या तोक्ते चक्रीवादळा मुळे कळंबोली वसाहतीला चांगलाच तडाखा बसला आहे. प्रचंड वेगाने वाहणाऱ्या या वादळाच्या वाऱ्याने वसाहतीमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पावसांच्या सरी सह सोसाट्याचा वारा वाहत होता. त्यामुळे कळंबोलीत काही ठिकाणी झाड व विजेचे खांब कोसळून सामाजिक नुकसान झाले आहे .एकीकडे वादळाचा तडाखा व पावसाची संतत धार असतानाही नागरिकांचे मात्र छत्री घेऊन खरेदीसाठी उडालेली झुंबड पहावयास मिळाली. कोसळलेली झाडे अग्निशामक दलाचे प्रमुख प्रतिक शिंदे यांनी तत्परतेने आपल्या जवानांसह हटवल्याने जनजीवन पूर्ववत झाले.

कळंबोली व आजूबाजूच्या परिसरात आज पहाटेपासून सौम्य प्रमाणात तोक्ते चक्रीवादळ वारे वाहू लागले होते. सकाळी सातच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पावसाने ही चांगलीच बरसात केली. थोडा फार प्रमाणात पाऊस बरसला नंतर दुपारपर्यंत चक्रीवादळ चांगल्या प्रकारे घोंगावत होते. प्रचंड वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे कळंबोली परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. काही ठिकाणी तुरळक घरावरील किंवा सोसायट्यांमधील पत्रे उडाल्याचे घटनाही घडल्या. कळंबोली वसाहतीमधील कोविड सेंटर नजीक एक मोठा वृक्ष तुटून पडल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. मात्र कळंबोली अग्निशामक दलाचे प्रमुख प्रतिक म्हात्रे यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे अग्निशामक दलाच्या सहा जवानांनी अथक परिश्रम करून कोसळलेले झाड बाजूला केल्याने समाजजीवन पूर्ववत झाले. वसाहती मधील सप्तशृंगी माता मंदिर जवळील पद पथावरील विजेचा खांब रस्त्यावर पडल्याने वाहतूक बंद झाली होती. कोसळलेला विजेचा खांब हा रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या मोटरसायकलीवर पडल्याने मोटरसायकलचे ही नुकसान झाले आहे. मात्र वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी याची त्वरित दखल घेऊन कोसळलेला खांब रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक पूर्ववत केली. सायंकाळी चार वाजेपर्यंत चक्रीवादळाचा घोघावत सुरूच होता. चक्रीवादळाची पूर्ण कल्पना देऊनही कळंबोली वसाहतीमधील नागरिक वादळासह कोसळणाऱ्या भरपावसात छत्री हातात घेऊन खरेदीसाठी बाहेर पडल्याने एकच झुंबड झाल्याचे दिसून आले. चक्रीवादळा दरम्यान कळंबोली वसाहतीमधील वीजही बंद करण्यात आली होती.



# पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील कोन फाटा येथे ४१ नागरिकांची अँटीजेन चाचणी

## ४० व्यक्ती निगेटिव्ह; तर एकाचा चाचणी अहवाल पॉझिटिव्ह ; नागरिकांनी विनाकारण बाहेर न पडण्याचे पोलिसांचे आवाहन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमध्ये कोरोनाचा संसर्ग आटोक्यात येत असून मागील काही दिवसांपासून कोरोनाच्या रुग्णांमध्ये देखील घट पडली असल्याचे दिसून येत आहे. कोरोनाची शृंखला पूर्णपणे तोडण्यासाठी महापालिका, पोलीस प्रशासनासह इतर प्रशासकीय यंत्रणा देखील सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत. नागरिकांनी घराबाहेर पडू नये यासाठी सरकारने विविध निर्बंध लागू केले आहेत. नागरिकांनी सर्व सूचना आणि नियमांचे पालन केल्यामुळे कोरोना आटोक्यात येण्यात मदत होत आहे. परंतु असे असले तरीही पनवेलमधील काही नागरिक अजूनही रस्त्यावर इतरत्र फिरत असल्याचे दिसून येत आहे. कोरोना पूर्णपणे संपला असल्याच्या गैरसमजुतीने मेडिकल अथवा अन्य खोटे कारण सांगून काही नागरिक घराबाहेर पडत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे प्रशासनाने यावर नामी उपाय शोधून काढला आहे.

नागरिकांनी घराबाहेर पडून कुठेही फिरू नये यासाठी विनाकारण फिरणाऱ्या नागरिकांची कोरोनाची चाचणी करण्यात येत आहे. आज (सोमवारी दि.१७ मे) जुना मुंबई-पुणे महामार्गालगत पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील कोन फाटा येथील निवारा बिट चौकी परिसरात फिरणाऱ्या नागरिकांची रॅपिड अँटीजन चाचणी करण्यात आली.

यावेळी पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्यासह पोलीस अधिकारी, अंमलदार उपस्थित होते. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र आजीवली आरोग्य अधिकारी डॉ.प्रभाकर पाटील, आरोग्यसेवक आर पी पाटील, आरोग्य सहाय्यक नारायण आयरकर, प्रवीण गायकवाड आदी कर्मचारी देखील उपस्थित होते. यावेळी रस्त्यावर फिरणाऱ्या ४१ नागरिकांची कोरोना चाचणी करण्यात आली. या चाचणीत ४० नागरिक निगेटिव्ह आले असून एकाचा कोरोना चाचणी अह-वाल पॉझिटिव्ह आला आहे. सदर व्यक्तीला प्राथमिक आरोग्य केंद्र आजीवली येथे उपचारासाठी नेण्यात आले असून त्याची रवानगी इंडिया बुल कोविड सेंटरमध्ये करण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली.

कोणत्याही वैद्यकीय अथवा अत्यावश्यक कारणाशिवाय नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडू नये. सर्वांनी घरी राहावे, सुरक्षित राहावे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध आहे. कोरोनाला पूर्णपणे हद्दपार करण्यासाठी नागरिकांनी सर्व नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे.

**- रवींद्र दौंडकर (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल तालुका)**